सोबत महाडीबीटी पोर्टलव्दारे वितरीत होणा-या शिष्यवृत्ती संदर्भात आढावा बैठकीत दिललेल्या सुचना मा. तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिस/डीबीटी/२०२०-२१/विकाप/४४ दिनांक ०८/०२/२०२१ अन्वये या कार्यालयास प्राप्त झालेल्या आहे. (सोबत प्रत जोडलेली आहे.) कृपया त्याचे अवलोकन करावे व त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

क्रमांक : तंशिविकाअ/शिक्षण /२०२१/ 324
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती.
दि. 09.02.2021

**प्रति,**

१. प्राचार्य, सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदविका/पदवी/पदव्युत्तर पदवी संस्था,अमरावती विभाग अमरावती यांनी सोबत जोडलेल्या मा. तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांच्या पत्राचे अवलोकन करुन त्याप्रमाणे आवश्यक कार्यवाही करण्याचे दृष्टीने अग्रेषित.

सहपत्र :- वरिल प्रमाणे.

प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण,विभागीय कार्यालय,
अमरावती.

प्रत :- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती यांना विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी

F/c

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७, मुंबई - ४०० ००१
दूरध्वनी क्र: ०२२-६८५९७४८६, ई-मेल :desk18@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

**अतितात्काळ - स्पीड पोस्ट /ई-मेलद्वारे**

क्र. : १८/तंशिसं/डीबीटी/२०२०-२१/विकाप/ 44.
दिनांक : 08 /०२/२०२१

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय :- **महाडीबीटी पोर्टलद्वारे वितरीत होणाऱ्या शिष्यवृत्ती संदर्भात आढावा बैठक ...**

संदर्भ :- १) मा. राज्यमंत्री, नगरविकास, उर्जा, आदिवासी विकास, उच्च व तंत्रशिक्षण, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन महोदयांनी यांचे अध्यक्षतेखाली डीबीटी पोर्टलद्वारे वितरीत होणाऱ्या शिष्यवृत्ती संबंधित बुधवार दि.१३/०१/२०२१ रोजी आयोजित आढावा बैठक.
२) उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे पत्र क्र.बैठक-२०२१/प्र.क्र.१४/तांशि-४ दि.२८/०१/२०२१ सोबत दि.१३/०१/२०२१ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

उपरोक्त विषयांस अनुसरुन मा. राज्यमंत्री, नगरविकास, उर्जा, आदिवासी विकास, उच्च व तंत्रशिक्षण, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन यांनी डीबीटी पोर्टलद्वारे वितरीत होणाऱ्या शिष्यवृत्ती संबंधित दि.१३/०१/२०२१ रोजी मा. प्रधान सचिव,उच्च व तंत्रशिक्षण, मंत्रालय, मा.प्रधान सचिव,बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मा.प्रधान सचिव,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय, मा. सचिव,सामाजिक न्याय, मंत्रालय, मा.सचिव,माहिती व तंत्रज्ञान, मंत्रालय व मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचेसोबत बैठक आयोजित केली होती.

सदर बैठकीला उपसचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग मंत्रालय, संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, अवर सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग मंत्रालय, अवर सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय आणि मुख्य परिचलन अधिकारी महाआयटी हे उपस्थित होते.

सदर बैठकीत मा.राज्यमंत्री, नगरविकास, उर्जा, आदिवासी विकास, उच्च व तंत्रशिक्षण, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन यांनी काही संस्थांच्या विरुध्द त्या संस्थेतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती न मिळाल्यामुळे त्यांची शुल्क प्रतिपूर्ती होत नसल्याने विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका अडवून ठेवणे, त्यांना शुल्क भरण्यासाठी तगादा लावणे यासारख्या तक्रारी प्राप्त झाल्या असल्याचे मा. संचालक, तंत्रशिक्षण व मुख्य परिचलन अधिकारी, महाआयटी यांच्या निदर्शनास आणले. तसेच बैठकीत मा. संचालक, तंत्रशिक्षण यांनी शासकीय तसेच शासन अनुदानित स्वायत्त महाविद्यालयांतील इतर शुल्क या प्रकारातील काही शिष्यवृत्तीच्या रक्कमा विद्यार्थ्यांना प्राप्त झाल्या नसल्याची बाब मा. राज्यमंत्री, नगरविकास, उर्जा, आदिवासी विकास, उच्च व तंत्रशिक्षण, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन यांच्या निर्शनास आणली. उपस्थित केलेल्या मुद्यांवर बैठकीत सांगोपांग चर्चा झाली.



08/02/2021

सदर बैठकीमध्ये मा. राज्यमंत्री नगरविकास, उर्जा, आदिवासी विकास, उच्च व तंत्रशिक्षण, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन यांनी दिलेल्या निर्देशानुसार, सर्व विभागीय कार्यालयांना खालीलप्रमाणे सूचित करण्यात येत आहे.

१) आपल्या विभागाच्या अधिनस्त येणाऱ्या सर्व संस्था /महाविद्यालयामध्ये शिक्षण घेणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवरुन शिष्यवृत्तीसाठी अर्ज केलेला आहे व ज्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती मंजूर केलेली आहे, तथापि तांत्रिक कारणास्तव अथवा आर्थिक तरतूद उपलब्ध नसल्याच्या कारणास्तव अद्यापपर्यंत ही शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांस मिळू शकलेली नाही, अशा विद्यार्थ्यांना संस्थांनी शैक्षणिक शुल्क भरण्यासाठी तगादा लावू नये. तसेच या विद्यार्थ्यांची गुणपत्रिका रोखून ठेवण्यात येऊ नये.

२) आपल्या विभागाच्या अधिनस्त शासकीय तसेच शासन अनुदानित स्वायत्त महाविद्यालयातील ज्या विद्यार्थ्यांचे इतर शुल्क शासनाने निर्धारित केलेल्या दरापेक्षा कमी प्रमाणात वितरीत झाले आहे अशा विद्यार्थ्यांना देखील संबंधित संस्थांनी शुल्क भरणा करण्यासाठी तगादा लावू नये.

सर्व विभागीय कार्यालयांनी आपल्या अधिनस्त सर्व संस्थांना /महाविद्यालयांना उपरोक्त सूचनांचे पालन अतिशय काटेकोरपणे करण्याबाबत कळवावे. जेणेकरुन या प्रकारच्या कोणत्याही तक्रारी प्राप्त होणार नाहीत.

(डॉ. अभय वाघ)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई.

प्रत: - मा. प्रधान सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग,४ था मजला, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना माहीतीसाठी सविनय सादर.( लक्षवेध - श्री. संजय धारुरकर - अवर सचिव )